**अनुसूचित क्षेत्रातील बांबू कापणी व विक्रीची प्रकिया सुलभ करणे, व्यवस्थापन करणे, ग्रामसभा सक्षमीकरण करणे**

## महाराष्ट्र शासन
### ग्राम विकास विभाग
**शासन निर्णय क्रमांकः पेसा-२०१२ / प्र.क्र.६५/पंरा-२**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१**
**तारीख: २३ नोव्हेंबर २०१५**

**वाचा :**

१) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक: पेसा-२०१२ / प्र.क्र.६५/पंरा-२, दिनांक ३१ मार्च २०१५.

**प्रस्तावना :**

अनुसूचित (पेसा) क्षेत्रातील लोकांच्या हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने मा.राज्यपाल महोदयांनी दि.१९.८.२०१४ रोजीच्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ मध्ये सुधारणा केली असुन त्यानुसार अनुसूचित क्षेत्रात गौण वनउपजांच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली आहे. त्यामध्ये “बांबूचा” समावेश केला आहे. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील गौण वनउपजांची मालकी ग्रामसभेकडे/पंचायतीकडे विहीत करण्यात आली आहे.

अ) दि.३० ऑक्टोबर २०१४ च्या अधिसूचनेअन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ मध्ये सुधारणा करुन गौण वन उत्पादनासाठी वाहतूक परवाना (Transit Permit) देण्याचे अधिकार ग्रामसभांना देण्यात आलेले आहेत.

ब) ही बाब विचारात घेऊन बांबूची कापणी आणि विक्री यासाठी दि.३१ मार्च २०१५ रोजी पहिला शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सदर शासन निर्णय या संक्रमण वर्षापुरता मर्यादित असुन दि.३० जुन २०१५ पर्यतच वैध/लागु होता.

क) या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीतुन या संक्रमण वर्षात असे दिसुन आले आहे की, गडचिरोली जिल्हयामध्ये बांबू कापणी व विक्रीच्या संदर्भात चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. गडचिरोली जिल्हयातील २० ग्रामपंचायतींनी पर्याय क्रमांक -दोन ची निवड करुन आपले उत्पन्न मोठया प्रमाणात वाढवलेले आहे.

ड) असे असले तरी, मागील संक्रमण वर्षातील बांबू कापणीसाठी अत्यंत कमी कालावधी मिळालेला असल्याने इतर जिल्हयांमध्ये बांबू मोठया प्रमाणात कापणीसाठी उपलब्ध झालेला नव्हता.

इ) गडचिरोली जिल्हयात दि.२४ सप्टेंबर २०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत उपस्थित असलेल्या संबंधितांनी दिलेले अभिप्राय (feedback) आणि मागिल वर्षात राबविण्यात आलेल्या प्रक्रियांच्या अनुभवाच्या आधारे असे लक्षात येते की, जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीने स्वंयप्रेरणेने ग्रामसभांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामसभांचे कायमस्वरुपी भरीव सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

वरील सर्व अभिप्राय विचारात घेवुन दि.३१ मार्च २०१५ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन नवीन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती आणि त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय शासनाने घेतलेला आहे.

## २. शासन निर्णयः-

ज्या अनुसूचित क्षेत्रामध्ये या हंगामात वनविभागाच्या Working Plan अनुसार बांबू कापणीयोग्य झाला आहे अशा विशेष क्षेत्रांची/गावांची/पंचायतींची मुख्य वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांनी निवड करावी आणि त्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व स्थानिक गट विकास अधिका-याला दयावी.

एखादया गावी किंवा पंचायतीमध्ये बांबू कापणी योग्य आहे परंतु वनविभागाने सदर गावाची/ पंचायतीची निवड केलेली नाही किंवा सदर गाव / पंचायत अधिसुचित केलेले नसेल तर ग्रामसभेला जिल्हास्तरीय मार्गदर्शन तक्रार निवारण समितीकडे आपली भुमिका मांडता येईल व त्यावर जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती योग्य तो निर्णय घेईल आणि समितीचा निर्णय अंतीम राहील.

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्र) बांबू क्षेत्र असलेल्या गावातील ग्रामसभा आणि पंचायत कोणत्या पध्दतीने बांबूची कापणी व विक्री यांची विल्हेवाट लावु इच्छिते यासाठी विचार विनिमय करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या- त्या ठिकाणी ग्रामसभेचे आयोजन करावे.

आवश्यकता असल्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ७ (१) मधील तरतुदींनुसार विशेष ग्रामसभा आयोजित कराव्यात.

महाराष्ट्र वन उत्पादन (मालकी हक्कांचे हस्तांतरण) अधिनियम, १९९७ च्या तरतुदी व त्यामधील बदल, गौण वन उत्पादनाची व्याख्या या सर्व बाबी ग्रामसभेमध्ये सोप्या भाषेत समजावुन सांगण्यात याव्यात.

३. बांबूची कापणी व विक्री या संदर्भात ग्रामसभेस खालील दोन पर्यायामधून एका पर्यायाची निवड करता येईल. यासाठी ग्रामसभेचे मत/ अभिप्राय ठरावाच्या स्वरुपात घेण्यात यावे. ठरावाचे नमुने अनुसूची-अ (पर्याय-एक) व अनुसूची-ब (पर्याय-दोन) मध्ये देण्यात आलेले आहेत.

**पर्याय १.** ग्रामसभा यांनी वनविभागाच्या सेवा प्राप्त करुन घेवुन वन विभागाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे वनविभागाने बांबूची कापणी व विक्री करावी व यापासुन येणारे उत्पन्न वन विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या खात्यावर जमा करावे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर रक्कम संबंधित ग्रामसभाकोष खात्यावर जमा करावी.

लिलाव करण्याअगोदर, स्थानिक गरजा व पारंपारिक व्यवसाय करणा-यांच्या गरजा / निस्तार हक्क विचारात घेवुन निर्णय घेईल व त्यानंतर शिल्लक राहीलेला बांबूचा लिलाव करेल.

किंवा

**पर्याय २.** ग्रामसभा स्वत: आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे तांत्रिक सहाय्य घेवून योग्य कार्यपध्दती अनुसरुन बांबूची कापणी, विक्री करु शकतात.

**पर्याय २ निवडल्यास खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.**

I. ग्रामसभा, ठरावांसह बांबू कापणीचे/ बांबू मिळविण्याचे परंपरागत क्षेत्र व त्याची हद्द निश्चित करील.

   **ही बाब पर्याय एक व पर्याय दोन निवडणा-या दोघांसाठीही लागु राहील.**

II. एखादया प्रकरणी, शेजारील गावाबरोबर हद्दीबाबत/क्षेत्राबाबत विवाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी <u>वन विभागाशी तसेच</u> सर्व संबंधिताशी विचार विनिमय करुन हद्द निश्चित करतील.

III. बांबूच्या कापणीसाठी ग्रामसभा, दोन ते तीन अनुभवी व्यक्तींची (Master Cutter) नियुक्ती करु शकेल. वन विभाग त्यांना बांबू कापणीचे अतिरिक्त प्रशिक्षण देऊ शकेल. हया व्यक्ती गावातील इतर ग्रामस्थांना बांबूची कापणी शास्त्रशुध्द पध्दतीने कशी करावी, याबाबतचे मार्गदर्शन करतील. कोणत्याही परिस्थितीत अशास्त्रशुध्द पदधतीने बांबूची कापणी होणार नाही याची खात्री करतील.

IV. कापणीसाठी येणारा मजुरांचा खर्च ग्रामसभा स्वत: भागवतील आणि जेथे- जेथे शक्य आहे तेथे आदिवासी विकास विभाग /आदिवासी विकास महामंडळ या उददेशासाठी फिरता निधी उपलब्ध करुन देतील. मानव विकास मिशन व इतर तत्सम योजनांखाली असलेला निधी यासाठी उपलब्ध करुन देता येईल (नियोजन विभाग शासन निर्णय

क्रमांक माविका-२०१४/प्र.क्र.१२/का-१४१८ दि.२१ ऑगस्ट २०१४). जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती ग्रामपंचायतीला मार्गदर्शन करेल व यासंदर्भात योग्य तो निर्णय घेईल.

V. पंचायत समितीच्या विस्तार अधिका-या पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याच्या उपस्थितीत ग्रामसभा बांबूची लिलाव पध्दतीने विल्हेवाट लावतील. लिलाव करण्याअगोदर, स्थानिक गरजा व पारंपारिक व्यवसाय करणा-यांच्या गरजा/निस्तार हक्क विचारात घेऊन ग्रामसभा निर्णय घेईल व त्यानंतर शिल्लक राहीलेल्या बांबूचा लिलाव करेल.

VI. ग्रामसभेने बांबू कापणी, विक्री वा विल्हेवाटीसाठी आदिवासी विकास विभाग अथवा संबंधित विभागाकडुन आगावु रक्कम घेतलेली असेल तर पंचायतीचा संबंधित अधिकारी अशी रक्कम वजा करुन घेईल आणि संबंधित विभागाला परत करेल.

VII. ग्रामसभेने कापणी केलेल्या बांबूची साठवणुक करण्यासाठी वनविभाग, जिल्हा परिषद, आदिवासी विकास विभाग अल्पदराने आपली आगारे (Depots) उपलब्ध करुन देतील.

**ज्या ग्रामसभा पर्याय-२ निवडतील त्या वाहतूक परवाना (Transit Permit) देण्यास सक्षम असतील आणि वाहतुक परवाना पुस्तक (Transit Permit Book) वन विभागाकडुन वेळेवर उपलब्ध करुन घेण्यात येईल. यासंदर्भातील विलंब टाळण्यासाठी पर्याय म्हणुन जिल्हास्तरीय मार्गदर्शक व तक्रार निवारण समिती वाहतुक परवाना पुस्तक (Transit Permit Book) उपलब्ध करुन देऊ शकेल.**

४. **ज्या ग्रामसभा कोणताही ठराव करणार नाहीत त्यांनी पर्याय -२ (दोन) ची निवड केली असे समजण्यात येईल.**

अनुसूचीत जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अंतर्गत आदिवासी तसेच इतर पारंपारीक वन निवासी यांना गौण वनउपज मिळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर अधिनियमामध्ये नमुद केलेल्या कार्यप्रणालीप्रमाणे जी ग्रामसभा बांबूची विल्हेवाट लावण्यास इच्छुक आहे त्यांचेवर हा शासन निर्णय बंधनकारक असणार नाही. त्यांनी सदर अधिनियम आणि त्याअंतर्गतच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

५. **जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती**

ग्रामसभा अथवा ग्रामसभेने नियुक्त केलेले प्रतिनिधी अथवा समितीच्या काही तक्रारी / अडीअडचणी असतील तर ते जिल्हा स्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीकडे अर्ज करु शकतील.

**जिल्हास्तरीय मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे असेल**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य वन संरक्षक (CCF) | सह-अध्यक्ष |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | अध्यक्ष |
| ४. उप वन सरंक्षक (DCF) | सदस्य |
| ५. प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) | सदस्य सचिव |
| ७. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले ग्रामसभेचे तीन सभासद | सदस्य |
| ८. जिल्हाधिकारी यांनी निवडलेले समाजिक संघटनेतील दोन प्रतिनिधी | सदस्य |

६ जिल्हयामध्ये ज्यावेळी पेसा कक्ष स्थापन करण्यात येईल त्यावेळी सदर कक्ष जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीचे सचिवालय म्हणुन काम पाहील. सदर पेसा कक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्या नियंत्रणाखाली काम करेल. पेसा अधिनियम आणि नियम याअंतर्गत येणारी सर्व कामे हा कक्ष पार पाडेल.

७. जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती या शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना येणा-या सर्व अडीअडचणी सोडविण्यासाठी आवश्यक ती पावले उचलेल. मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर सर्व प्रकारच्या मार्गदर्शक सुचना देईल. या

प्रेरणादायक मार्गदर्शक सुचनांमुळे हा संपुर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यास मदत होईल. या समितीसाठी मार्गदर्शक सुचना **<u>अनुसूची-एक</u>** मध्ये दिलेल्या आहेत.

८. ग्रामसभांना सुयोग्य निर्णय घेण्यासाठी संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी/पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी योग्य ते मार्गदर्शन व मदत करतील.

ग्रामसभांना सशक्त करण्यासाठी आणि पर्याय क्रमांक-दोन यशस्वी करण्यासाठी **<u>अनुसूची-दोन</u>** मध्ये मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११२०१०४७११३०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.11.23 13:14:26 +05'30'

वि.गिरिराज
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन,
६. मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई,
७. मा. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई,

८. सर्व विभागीय आयुक्त,
९. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.
१२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड. (जिल्हयातील सर्व पाचव्या अनुसूचीतील गावे असणारे तालुके)
१३. निवडनस्ती, पं.रा.-२.

# **<u>अनुसूची-अ</u>**

**<u>ठराव क्र.१-(पर्याय-१)</u>**

ज्याअर्थी बांबूसह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

म्हणुन आम्ही ग्रामसभेचे मतदार, बांबूची कापणी / विक्री/ वाहतुक आणि विल्हेवाट करण्यासाठी आमच्या वतीने **<u>वनविभागास प्राधिकृत करीत आहोत.</u>**

पुढे आम्ही असाही ठराव करतो की, आमच्या गावाची/ ग्रामपंचायतीची बांबू कापणी योग्य असलेली क्षेत्रे निश्चित करीत आहोत.

आम्ही, बांबू कापणी/ विक्रीची अंतिम विल्हेवाट लावण्याच्या संपुर्ण प्रक्रियेचे नियंत्रण, पर्यवेक्षण करण्यासाठी ग्रामसभेतील/ साधन संपत्ती नियोजन व सनियंत्रण समितीतील खालील प्रतिनिधींची नियुक्ती करीत आहोत. ( ४ प्रतिनिधीपर्यंत)

# अनुसूची-ब

## ठराव क्र.२-(पर्याय-२)

ज्याअर्थी  बांबूसह सर्व गौण वनउत्पादनांची मालकी पंचायत आणि ग्रामसभेकडे विहित करण्यात आली आहे.

म्हणुन आम्ही ग्रामसभेचे मतदार  असा ठराव करतो की, आमची ग्रामसभा बांबूची कापणी व विक्री  खरेदी, वाहतुक आणि विल्हेवाट स्वत: करेल.

पुढे आम्ही असाही ठराव करतो की, आमच्या गावाची/ग्रामपंचायतीची बांबू कापणी योग्य असलेली क्षेत्र निश्चित करीत आहोत आणि बांबू कापणी व विक्रीसाठी, वनविभाग आणि इतर सर्व संबंधित विभाग  आवश्यक ते सर्व तांत्रिक व इतर सहाय्य ग्रामसभेला करण्याची मागणी करीत आहोत.

# अनुसूची-एक

## मार्गदर्शक सुचना

जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीची भुमिका आणि जबाबदारीशी संबंधित मार्गदर्शक सुचना :-

I. जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीने ग्रामसभेची योग्य अशा पध्दतीने क्षमता बांधणी करणे गरजेचे आहे. ही क्षमता बांधणी अशा प्रकारे करण्यात यावी की, ग्रामसभा बांबु विक्री पारदर्शकरित्या परिणामकारकपणे करु शकतील. ग्रामसभांना क्षेत्रनिहाय प्रशिक्षण देता येऊ शकेल.

II. यासाठी बाबूंच्या हंगामात पेसा क्षेत्रात जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समिती अर्धवेळ किंवा पुर्ण वेळ अतिरिक्त कर्मचारी वर्गाची नियुक्ती करु शकतात. हे कर्मचारी निवृत्त झालेले वन कर्मचारी अथवा सामाजिक कार्यकर्ते असु शकतात. समिती काही सेवा बाहय स्त्रोतांकडुन देखिल घेऊ शकतात.

III. यासाठी समिती मानव विकास कार्यक्रम, आदिवासी विकास विभागाच्या केंद्रिय अर्थसंकल्प व इतर अशा निधीतुन खर्च भागवु शकेल.

IV. जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीने बांबूच्या विक्रीसाठी एक प्रमाणित पध्दत निश्चित करण्यासाठी ग्रामस्थाना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. या संदर्भात ग्राम समिती व खरेदीदारांच्यासाठी एक आदर्श विक्री करारनाम्याचे वितरण समितीला करता येईल.

V. ग्रामसभांकडुन कमी प्रमाणात गौण वनउपजाचा लिलाव करण्यात येतो. या लिलावातुन योग्य दराचा फायदा मिळण्यासाठी चांगली बाजारपेठ उपलब्ध करणे किंवा ग्रामसभांच्या संमतीने जिल्हयातील एकत्रित ई-लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी व्यासपीठ (Platform) उपलब्ध करणे ही जिल्हा मार्गदर्शन व तक्रार निवारण समितीची कार्यकक्षा राहील.

VI. सदर समिती वाहतुक परवाना (Transit Permit) वन विभागाकडुन एकत्रित घेऊन ग्रामसभांना पुरवु शकेल.

VII. ग्रामसभेला वाहतुक परवाना (Transit Permit) विहित मुदतीत मिळेल याची खात्री समितीने करावी.

VIII. कामाच्या हंगामामध्ये ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा / तालुका पेसा समन्वयक यांचा दुरध्वनी क्रमांक /सहायता केंद्र (HELPLINE) उपलब्ध करुन देता येईल.

IX. माहितीपत्रके किंवा चित्रपटाव्दारे ग्रामस्थाना मदत करता येऊ शकेल.

X. संसाधन नियोजन आणि व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची शैक्षणिक सहल आयोजित करता येईल.

# अनुसूची-दोन

**ज्या ग्रामसभा पर्याय-२ निवडतील त्यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना:-**

ग्रामसभेचे बळकटीकरण करण्यासाठी आणि बांबूची विक्री परिणामकारकरित्या हाताळण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

I. गावक-यांना वेतन अदा करताना ग्रामसभाकोषातुन शक्यतो बँक खात्यातुन धनादेशाव्दारे अथवा पासबुकव्दारे अदा करावे. शक्यतोवर जेवढे आवश्यक असेल तेवढेच रोखीने वेतन अदा करावे.

II. बांबूच्या विक्रीतुन भरीव असे उत्पन्न ग्रामकोषामध्ये जमा होण्याची शक्यता असल्याने ही रक्कम फक्त पगारासाठी शक्यतो अदा करण्यात येवु नये काही प्रमाणात रक्कम (उदा.२५%) सार्वजनिक हितासाठी वापरावी.

III. पेसा नियम (प्रकरण तीन मध्ये नमुद केल्याप्रमाणे) योग्य पध्दतीने खाती पुस्तक ठेवणे आवश्यक राहील. यासाठी गावातील सुशिक्षित मुले ठेवता येऊ शकतील. त्यासाठी त्यांना योग्य मानधन देण्यात यावे.

IV. ग्रामस्थांनी कंत्राटदार किंवा त्यांच्या माणसाच्या माध्यमातून बांबू कापणी न करता स्वत: बांबू कापणी करणे आवश्यक आहे.

V. असे निदर्शनास आले आहे की, जर खालीलप्रमाणे बांबूची विक्री केली तर ग्रामसमितीला बांबू विक्रीतुन अधिक उत्पन्न मिळु शकते.

अ) बांबूच्या जुडग्यांची विक्री करण्याऐवजी पुर्ण बांबूची विक्री करणे.

आ) पुर्ण बांबू योग्य पध्दतीने प्रमाणित करुन श्रेणीनिहाय वेगळा करण्यात यावा.

ग्रामसभांनी या पध्दतीने व्यवहार केल्यास त्यांच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ होण्याची शक्यता आहे.

वरील मार्गदर्शक सुचनांच्या अंमलबजावणीतुन असे अपेक्षित आहे की, हळु हळु आणि नजीकच्या काही वर्षात ग्रामसभा बांबू कापणी आणि विक्री यांच्यामध्ये पुर्णपणे सक्षम झाल्याचे दिसुन येईल.